बिगर राज्य नागरी सेवेतून (Non-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष (Benchmark Criteria) विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५/२०१९/दहा
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
तारीख: **१६.०८.२०१९**

संदर्भः-

१) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२,
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१०/प्र.क्र.५६३/२०१०/दहा, दि.०७.०९.२०११,
३) केंद्रशासन कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. १४०१५/३०/ २०१५-AIS-I, दि. २०.०३.२०१५,
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१६/प्र.क्र.५४/२०१६/दहा, दि.०८.०२.२०१६,
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१७/प्र.क्र.४५/२०१७/दहा, दि.०४.०२.२०१७ आणि तद्नुषंगिक समक्रमांकित दि.२३.०२.२०१७ आणि दि.१९.०४.२०१७ ची शुध्दीपत्रके,
६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१८/प्र.क्र.३२/२०१८/दहा, दि.२०.०१.२०१८,
७) सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. एआयएस १३१८/प्र.क्र.३२/२०१८/दहा, दि.२८.०२.२०१८,
८) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. एआयएस १३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/दहा, दि.०९.०७.२०१९.
९) समक्रमांकित दिनांक १०.०७.२०१९ चा शासन निर्णय.

प्रस्तावना-

सन २०१८ च्या निवडसूचीसाठी बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीसाठी संघ लोकसेवा आयोगाकडे शिफारस करण्याकरीता समक्रमांकित दिनांक १०.०७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये पात्रता निकष (Bench Mark Criteria) विहीत केले आहेत.

तथापि सांगली, कोल्हापूर, सातारा इत्यादी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे महापूर आल्यामुळे निर्माण झालेली आपत्कालिन परिस्थिती विचारात घेऊन, सन २०१८ च्या निवडसूचीसाठी (Non SCS) बिगर राज्य नागरी सेवेतील सदर जिल्ह्यांत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांचे प्रस्ताव संबंधित मंत्रालयीन विभागात विहीत मुदतीत सादर करणे शक्य झालेले नाही. ही बाब विचारात घेऊन मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून सामान्य प्रशासन

विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>

सन २०१८ च्या निवडसूचीसाठी बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीसाठी संघ लोकसेवा आयोगाकडे शिफारस करण्याकरीता समक्रमांकित दिनांक १०.०७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये पात्रता निकष (Bench Mark Criteria) विहीत करण्यात आले आहेत. तसेच विहीत निकष पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक १६.०८.२०१९ पर्यंत साप्रवि कार्यासन १० मध्ये पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

२. या शासन निर्णयान्वये वरीलप्रमाणे बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीसाठी संघ लोकसेवा आयोगाकडे शिफारस करण्याकरीता, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून सामान्य प्रशासन विभागाकडे विहीत निकष पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रस्ताव सादर करण्यास **दिनांक २३.०८.२०१९ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१६१२१४४५१२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sitaram Janardan Kunte

Digitally signed by Sitaram Janardan Kunte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9815c3f980028edcb4508e57abe4358049e7f22849abba46cc29adaf9ed9088f, cn=Sitaram Janardan Kunte
Date: 2019.08.16 15:16:27 +05'30'

(सीताराम कुंटे)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७. सचिव, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली,
८. सचिव, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली,
९. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
१०. सर्व मंत्रालयीन विभाग,
११. निवड नस्ती.